नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक १२/०४/२०२४ (शुक्रवार) सायंकाळ

---

### पो.स्टे. कळमेश्वर हद्दीमधील बाजार चौक परिसरात
### सट्टापट्टी जुगार अड्डयावर धाड
### —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक ११/०४/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण येथील स्टाफ अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीतील बाजार चौक परिसरात सार्वजनिक ठिकाणी एक इसम लोकांकडुन पैसे घेवुन मोबाईल फोनद्वारे सट्टीपट्टीचे आकडे लिहुन पैशाचे हारजीतचा अवैधरीत्या जुगार खेळत आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून सदर पथकाने बाजार चौक येथे सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे— प्रफुल प्रेमराज उके, वय ३२ वर्ष, रा. कळमेश्वर** हा लोकांकडुन सट्टीपट्टीचे आकडे लिहुन पैशाचे हारजीतचा जुगार खेळतांना मिळुन आला. आरोपीस ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन नगदी ४२००/— रू. व सट्टापट्टी साहित्य, ०२ मोबाईल एकूण २६,२१०/— रू चा मुद्देमाल जप्त करून आरोपीस जप्त मुद्देमाल व कागदपत्रांसह पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे कळमेश्वर यांचे ताब्यात देण्यात आले. आरोपीविरूद्ध कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक किशोर शेरकी, HC प्रमोद तभाने, HC संजय बांते, HC दिनेश आधापुरे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

## पो.स्टे. अरोली हद्दीमधील मौजा निमखेडा येथील सट्टापट्टी अड्डयावर धाड

## —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक ११/०४/२०२४ रोजी पोलीस स्टेशन अरोली येथील स्टाफ अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन अरोली हद्दीतील **अजय कीसन तांडेकर रा. कन्हान** हा निमखेडा मुख्य चौकातील एका बंद पानठेल्याचे मागे मोकळया जागेत पानठेल्याचे लाईटचे उजेडात जुगार खेळणाऱ्यांकडून पैसे घेऊन जुगार खेळत आहे. अशी माहिती प्राप्त झाले वरून सदर स्टाफने रेड केली असता **आरोपी नामे— अजय किशन तांडेकर वय ४२ वर्ष रा. अशोक नगर कन्हान ता. पारशिवनी** हा जुगार खेळतांनी मिळुन आला. आरोपीस ताब्यात घेवुन आरोपीची अंगझडती घेतली असता १) पेन व कार्बनचे सहायाने मटक्याचे आकडे लिहिलेले दोन कागदी पट्टया २) एक कार्बनची पट्टी ३) एक निळया शाईचा पेन कि. ०५ /— रू. ४) लोकांकडुन जुगाराकरीता घेतलेल्या नगदी १०६० रू. असा एकुण १०६५ रू. चा मुद्देमाल मिळुन आला.

तसेच पोलीस स्टेशन अरोली हद्दीतील **आरोपी नामे— युवराज दौलत किरपान, वय ४२ वर्ष, रा. वार्ड क्र. ०३ अरोली ता. मौदा** हा त्याचे पानठेल्यात लोकांकडुन पैसे घेवुन सट्टीपट्टीवर वरली मटक्याचे आकडे लिहुन हारजितचा जुगाराचा खेळ खेळत आहे. अशा विश्वसनीय माहिती वरून स्टाफसह जावुन रेड केली असता **आरोपी नामे— युवराज दौलत किरपान, वय ४२ वर्ष, रा. वार्ड क्र. ०३ अरोली ता. मौदा** हा जुगार खेळतांनी मिळुन आला. आरोपीस ताब्यात घेवुन आरोपीची अंगझडती घेतली असता पॅन्टच्या खिशात पांढरा रंगाचा कागदावर वरली मटक्याचे आकडे लिहिलेले व नगदी १२५०/— रू. व काळया रंगाचा बॉलपेन कि. ०५ रू. असा एकुण १२५५ रू. चा मुद्देमाल मिळुन आला.

वरील मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे अरोली येथे कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे अरोली येथील ठाणेदार श्री. सपोनि निशांत फुलेकर, सफौ टिकाराम जाधव, पोहवा राजेंद्र पुडके, चालक संग्राम चाचेरे, पोशि कृष्णा नागोसे यांनी पार पाडली

# अवैधरीत्या देशी दारूची वाहतूक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
# नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक ११/०४/२०२४ रोजी १६.२६ वा. दरम्यान पोलीस स्टेशन कोंढाळी येथील स्टाफ पोस्टे कोंढाळी परीसरात पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, दादाराव ढोबाळे हा कोंढाळी येथुन मोटर सायकलने देशी दारूच्या पेटया अमरावती रोडनी घेवून जात आहे अशा मिळालेल्या माहिती वरून स्टाफसह नांदोरा फाटा ता. काटोल येथे अमरावती रोडवर जावुन नाकाबंदी केली असता मोटरसायकल क्र. MH-31/BV-9920 चा चालक **आरोपी नामे— दादाराव शामरावजी ढोबाळे, वय ३१ वर्ष, रा. सावळी ता. कारंजा जि. वर्धा** हा अवैदयरित्या विनापरवाना दारु बाळगुन वाहतुक करतांनी मिळून आल्याने आरोपीचे ताब्यातून देशी दारूच्या ३२ निपा प्रत्येकी १८० एम एल प्रमाणे एकुण ५७६० एम एल एकुण २२४० रू व हिरो होंडा मोसा क्र. एमएच ३१ बी व्ही ९९२० किंमती २५०००/— रू असा एकुण २७२४०/— रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरूद्ध कलम ६५ (अ) (ई) म.दा.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कोंढाळी येथील ठाणेदार सपोनि राजकुमार त्रिपाठी, पोहवा सुनिल ठोंबरे, पोलीस अंमलदार गोविंद मैंद यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर